# राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग

## महाराष्ट्र शासन

नोटीस

फाईल क्र. रागावितंआ/फा-२०२४/PMS/प्र.क्र.४/
सामान्य प्रशासन विभाग
अॅपीजे हाउस, ३ रा मजला,
दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ,
मुंबई-४०० ०२०.
दूरध्वनी क्र. -०२२ - २२०२४७११
ई-मेल- rgstcmaha@rediffmail.com
दिनांक: - ०२ मे, २०२४

प्रति,
________________________________
________________________________
________________________________
________________________________

विषय - आयोगाच्या कार्यालयासाठी Project Management System Portal संबंधी दरपत्रके मागविणेबाबत.

राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, अेपीजे हाऊस, ३रा मजला, के.सी. कॉलेज जवळ, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई या कार्यालयासाठी Project Management System Portal Design, Development, Deployment करणे व त्याचे तीन वर्षांचे मेंटेनन्स या करीता पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr.No. | Item | Particulars | Required Quantity | Rate inclusive of all Taxes and Other Charges if any |
|---|---|---|---|---|
| 1. | RGSTC Project Management System Portal | Design, Development, Deployment and 3 Yrs. Maintenance of RGSTC PMS Portal | 01 Quantity | |

दरपत्रके सादर करणेसंबंधी अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत. -

१. सदर दरपत्रकाचा नमुना सेवा पुरवठादारांने त्यांच्या लेटरहेडवर सही व शिक्कयांनिशी दि. ०२ मे, २०२४ ते १३ मे, २०२४ रोजी पर्यंत सिलबंद लिफाफ्यातून आयोगाच्या कार्यालयात शासकीय सुट्ट्या वगळून इतर दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत व दिनांक १३ मे २०२४ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत सादर करावेत. सदर सिलबंद लिफाफ्यावर ठळकपणे "Technical Bid – Tender for RGSTC Project Management System Portal" (Cover -1) and "Financial Bid - Tender for RGSTC Project Management System Portal" (Cover -2) असे नमूद करून दोन वेगवेगळया सिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे. सदरची नोटीस कार्यालयाच्या https://rgstc.maharashtra.gov.in/tender या वेबसाईटवर माहितीसाठी उपलब्ध राहिल.

२. सदर सिलबंद लिफाफे आयोगाच्या अॅपीजे हाउस, ३ रा मजला, दिनशॉ वाच्छा रोड, के.सी. कॉलेज जवळ, मुंबई-४०० ०२० या कार्यालयात दिनांक १५ मे, २०२४ रोजी सकाळी ११.३० वा. उघडण्यात येतील.त्यावेळी दरपत्रक सादर केलेले

सेवापुरवठादार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी अधिकारपत्रासह (Authority Letter) या कार्यालयात उपस्थित राहता येईल मात्र लिफाफा उघडणे आणि त्यासाठी उपस्थित रहाणे याबाबत कोणताही स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही याची दरपत्रकदारांनी नोंद घ्यावी. निविदेत नमूद केलेल्या प्रमाणे दिनांक १५ मे, २०२४ रोजी दुपारी १२.३० वा. सेवापुरवठादार यांना त्यांनी कमिशन करिता तयार केलेल्या Sample Module चे सादरीकरण करावे लागेल व त्यापैकी गुणवत्ता (मेरीट) असलेले Sample Module सादरीकरण करणाऱ्या सेवापुरवठादार यांच्या तांत्रिक पात्रता तपासणीत पात्र ठरलेल्या निविदाधारकांची Financial Bid दिनांक १६ मे, २०२४ रोजी सकाळी ११.३० वा. उघडण्यात येतील.

३. सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर केलेले दरपत्रकासोबत संस्था /कार्यालये यांच्यामध्ये Project Management System Portal कार्यान्वित केल्याच्या अनुभवाचे दाखले सोबत जोडणे आवश्यक राहिल.

४. दरपत्रकासोबत दरपत्रकधारकांने पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे सक्तीचे राहील.

५. दरपत्रकावर जीएसटी नंबर नमूद करणे सक्तीचे आहे.

६. पॅनकार्ड व जीएसटी क्रमांक नमूद न करता सादर केलेली दरपत्रके सरळ नामंजूर करण्यात येतील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. ज्या सेवापुरवठाधारकाच्या दरपत्रकातील लघुत्तम दराने Project Management System Portal (मान्य स्पेसिफीकेशन नुसार) खरेदी करण्याचे कार्यालयाने मान्य केले आहे, त्या सेवापुरवठादारास देयकाप्रमाणे Project Management System Portal कार्यान्वित केल्यानंतरच व तसे प्रमाणित झाल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम (Advance payment) अदा केली जाणार नाही.

८. मुख्य निविदा पत्रक आणि इतर अटी व शर्ती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. (https://rgstc.maharashtra.gov.in/tender)

९. या निविदेबाबत काही शंका असल्यास आयोगाच्या ईमेल आयडी (rgstcmaha@rediffmail.com) वर संपर्क साधावा.

(डॉ. नरेंद्र शहा)
सदस्य सचिव, रागांवितंआ